पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक . ६

शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार दि. २४ /६ /०९ रोजी सकाळी ११ : ३०** **(साडे अकरा)** वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

वृत्तांत कायम करणे.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्रं. ४७
मा. उज्वल केसकर व मा. वागसकर यांचे दि. ८/६ /०९ चे पत्र.

पुणे शहराच्या सी झोन व बी १ + डी १० झोन मध्ये मुंबईच्या धर्तीवर ०.३३ % एफ.एस.आय. प्रिमिएम आकारून ०.३३ % एफ.एस.आय.वापरण्यास परवानगी देण्यासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये जुन्या हद्दीसाठी कार्यवाही सुरू करावी व नवीन हद्दीसाठी डी.पी.मंजूर करण्यापूर्वी सदरची तरतूद करण्यासाठी राज्य सरकारला विनंती करावी.

विषय क्रं. ४८
मा. शिवराम मेंगडे व मा. राजाभाऊ बराटे यांचे दि. १६/६ /०९ चे पत्र.

गुंठेवारी क्षेत्रामध्ये अनेकजण खाजगी ले–आऊट तयार करून जमीनीचे एक गुंठा, दोन गुंठा असे तुकडे करून जमीनीची विक्री होते. असे व्यवहार एकराने चालतात अशा वेळी ॲमिनिटी म्हणून ओपन स्पेस ठेवली जात नाही व सगळीकडे प्रचंड बांधकामे होतात.

तरी याबाबतीत बंधन घालण्यासाठी एकूण खाजगी ले–आऊटचे प्रकरणात १०% सक्तीची ओपन स्पेस ठेवण्याचे बंधन करावे व याची अंमलबजावणी शहर सुधारणा समितीमध्ये ठराव मान्य झाल्यापासून करावी.

विषय क्रं. ४९

पुणे पेठ कोंढवा खु.स.नं.४७ मधील प्ले ग्राऊंडचे आरक्षण रद्द करून त्या ठिकाणी मुस्लिम दफनभूमीसाठी आरक्षण टाकणेबाबत मा.महादेव बाबर व मा.सौ.मेघा बाबर यांचे दि. ३१/१२/०८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठ.क्र. २०६, दि. १०/६ /०९ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /न.अ /१३३, दिनांक १०/६ /०९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रं. ५०

पुणे पेठ पाषाण स.क्र.१३४ येथील विट भट्टी झोन मधील काही भागाचे रूपांतर बगीच्या आणि खेळाचे मैदान या आरक्षणा मध्ये करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /न.अ /१३६, दिनांक १०/६ /०९ चे पत्र.

विषय क्रं. ५१

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात येत असलेल्या माहे मार्च २००९ चे टी.डी.आर.बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /न.अ /१४०, दिनांक १२/६ /०९ चे पत्र.

विषय क्रं. ५२

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात येत असलेल्या माहे एप्रिल २००९ चे टी.डी.आर.बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /न.अ /१४१, दिनांक १२/६ /०९ चे पत्र.

विषय क्रं. ५३

मेंटेनन्स सर्व्हेअर, वर्ग ३ (वे.श्रे.रू.५०००/– ते ११९२५/–+मान्य भत्ते) आणि अतिक्रम निरिक्षक, वर्ग ३ (वे.श्रे.रू.४५००/– ते १००२५/–+मान्य भत्ते) या पदावर बढतीने नेमणूका करणेसाठी मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ /अतिमआ/उआ(विकाक्र ३) /से/ १४६, दि. १६/६ /०९ चे पत्र.

विषय क्रं. ५४

पुणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) (अे अे) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेली सूचना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील परिशिष्ट आर–७ मध्ये अ.क्र.८ येथे ई.डब्ल्यू.एस.हौसिंगकरिता असलेला नियम सुधारित करणेबाबत फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/९२, दि. २९/५/२००९ चे पत्र.

विषय क्रं. ५५

पुणे शहरा मधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणेचे दृष्टीने मेट्रो प्रकल्पाचे नियोजन व अंमलबजावणी करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ / नअ / १४६७, दि.२५/२/०९ चे पत्र.

विषय क्रं. ५६

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील नियोजित विभागणी ,आराखडा मंजूर करतानाच्या नियमामध्ये सुधारणा करणेसाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करण्याबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१३४०, दि. ४/२/०९ चे पत्र.

विषय क्रं. ५७

पुणे मनपाच्या उदयान विभागाकडे **माळी** (वेतनश्रेणी २५५० ते ३२००+मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ /उद्यान /से /१५०२, दिनांक २६/२/२००९ चे पत्र.

विषय क्रं. ५८

पुणे मनपाच्या विद्युत विभागाकडे **बत्तीवाला** (वेतनश्रेणी २७५० ते ५६९० + मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ /उद्यान /से /१५०३, दिनांक २६/२/२००९ चे पत्र.

विषय क्रं. ५९

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मंजूर विकास योजनेतील सार्वजनिक निमसार्वजनिक विभागातील क्षेत्रावर काही अटीवर वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबत. एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/१२०६, दि. १३/१/२००९ चे पत्र.

<u>विषय क्रं. ६०</u>

मुद्रणालयाकडील कोठीपाल, मशिन फोरमन, सिक्युरिटी फोरमन, डी.टी.पी. फोरमन व प्लेट मेकर कम कॅमेरा ऑपरेटर, वर्ग ३ या पदांच्या भरतीसाठी निवडयादी / प्रतिक्षायादीस मान्यता घेणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/अतिमआ (वि) /उका /से/३९, दिनांक २/ ५ /२००९ चे पत्र.

<u>विषय क्रं. ६१</u>

पुणे मनपाकडील मुद्रणालयाकडील वेब ऑफसेट बॉलर वर्ग ३ (वे.श्रे.रू.३१५०/– ते रू. ७३००/– +मान्य भत्ते) या पदांच्या भरतीसाठी निवडयादी / प्रतिक्षायादीस मान्यता घेणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/अतिमआ (वि) / उका /से/४०, दि.२/ ५ /२००९ चे पत्र.

<u>विषय क्रं. ६२</u>

पुणे मनपाकडील मुद्रणालयाकडील वेब ऑफसेट मशिनमन वर्ग ३ (वे.श्रे.रू.४०००/– ते रू. ९६९५/– +मान्य भत्ते) या पदांच्या भरतीसाठी निवडयादीस मान्यता घेणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/अतिमआ (वि) / उका /से/४१, दि.२/ ५ /२००९ चे पत्र.

(टीप – विषय क्र.५४ ते ६२ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

<u>**विषय क्रं. ६३**</u>

खराडी स.नं. ७१ व ६९ चे हद्दीवरील ३० मी. डी. पी. रस्त्यापासून ते खराडी वाघोली हद्दीवरील ६० मी. डी.पी. रस्त्यापर्यत स.नं. ६९,६८,६६ आणि ६७ मधून बी.पी.एम.सी. ॲक्ट कलम २०५ नुसार १८ मीटर (८० फुट) रस्ता आखणेबाबत मा. बापू पठारे व मा. सौ. सुमन पठारे यांचे दि. २९/४/०८ च्या पत्रावर शहर सुधारणा समिती ठ.क्र.२५ दिनांक ६/५/०८ ला अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी जा. क्रं. मआ/नअ/५९०, दिनांक ४/०९/०८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>**विषय क्रं. ६४**</u>

पुणे पेठ बिबवेवाडी स.नं.६३४ पंचशिल गणपतनगर वसाहत या घोषित झोपडपट्टीसाठी बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम २०५ अन्वये २० फुट रुंदीचा रस्ता आखणेबाबत मा.सुनिल बिबवे व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. ५.७.०७ च्या पत्रावर शहर सुधारणा समिती ठ.क्र.११०, दि.१३.७.०७ ला पत्राला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/नअ/१४१९, दि.१७.२.२००९ अन्वये पाठविलेला अभिप्राय.

(टीप – विषय क्र.६३ ते ६४ ची जागा पाहणी दि. ११. ६ .२००९ रोजी करण्यात आली आहे .)

उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका